# सामाजिक परिवर्तनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका

**प्रा जयंत राऊत**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री गणेश कला महाविद्यालय,
कुंभारी, अकोला
बी 7, निसर्गदिप गजानन पार्क जवळ,
तुलशान बंगल्याचेमागे, गितानगर,
अकोला 444 002, मो 9822697280

**सारांश**

हजारो वर्षे अज्ञान, अन्याय, मानहानी व अत्याचार यांना बळी पडलेल्या अस्पृश्य बांधवांच्या मनात आत्मविश्वासाची भावना निर्माण करून आपल्या हक्कांसाठी संघटितपणे लढा देण्यास त्यांना प्रवृत्त करणारे, त्याकरिता आपले जीवनसर्वस्व वेचणारे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील एक महान नेतृत्व म्हणजे भीमराव रावजी उर्फ डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकरांचा उल्लेख केला जातो. घटना तयार करण्याच्या संदर्भात त्यांनी बजावलेल्या कामगिरीची घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी गौरवपूर्ण शब्दात प्रशंसा केली. अस्पृश्यता निर्मूलनाकरिता घटनात्मक तरतुदी करणारे व सामाजिक परिवर्तनाचे आग्रही पुरस्कर्ते म्हणून डॉ. आंबेडकरांचा उल्लेख भारतीय इतिहासात ठळकपणे केला जाईल.

**बीज शब्द (Keyword) :** जातीय निवाडा, राखीव जागा, जातीव्यवस्था, सामाजिक परिवर्तन, घटनासमिती, गुलामगिरी, अस्पृश्यता निवारण, घटना समिती, दुर्बल घटक, सामाजिक न्याय,समता, स्वातंत्र्य, बंधूत्व,

समाजपरिवर्तनाची निकड सामान्य जनतेला पटवून सांगण्याचा एकीकडे प्रयत्न करीत असताच, दुसरीकडे दलितांच्या दुःखाचा परिहार व त्यांच्या हक्कांची पूर्ती विधिमंडळांतून कायद्यांद्वारा करून घेण्याचा प्रयत्नही आंबेडकरांनी चालविला होता. सायमन कमिशन,

गोलमेज परिषदा यांसमोर दलितांच्या समस्या त्यांनी दमदारपणे मांडल्या. अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतदार संघांना १९३२ मध्ये मॅकडोनल्ड यांच्या जातीय निवाडयाने मंजूरी दिली होती. (भारतीय समाजात अधिकाधिक फूट पाडणे हे ब्रिटिश सत्ताधीशांचे उद्दिष्ट होतेच) परंतु तसे झाल्यास अगोदरच फुटीरतेची विषबाधा झालेल्या भारतीय समाजाचे अधिकाधिक तुकडे व्हायला वेळ लागणार नाही व राष्ट्रीय एकात्मेवर तो कुठाराघात ठरेल हे जाणून गांधींनी जातीय निवाडयाला प्रखर विरोध केला आणि त्याकरिता आमरण उपोषण सुरू केले. गांधींची अमाप लोकप्रियता लक्षात घेऊन, अस्पृश्यांकरिता राखीव जागा असाव्यात या अटीवर संयुक्त मतदार संघांना मान्यता देऊन आंबेडकरांनी नाईलाजाने तडजोड स्वीकारली. परंतु त्या राखीव जागांकरिता काँग्रेसने आपल्या पक्षातील अस्पृश्य उमेदवार १९३७ च्या निवडणुकात उभे करावे हे आंबेडकरांना पटले नाही. त्यामुळे १९४४ मध्ये त्यांनी आपली विभक्त मतदार संघांची मागणी पुन्हा पुढे दामटली. विधिमंडळात अस्पृशांना आवश्यक ते प्रतिनिधित्व देण्याचा तोच एक मार्ग आहे असे त्यांना वाटत होते.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या आयुष्यभर वाणीने व लेखणीने जातीव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. त्यांची भूमिका समाजशिक्षकाची, समाजाची दुःखे दूर करण्याच्या हेतूने समतेकरिता लढा सुरू करणाऱ्या एका समाजसुधारकाची होती. आपले विचार प्रसृत करण्यासाठी त्यांनी ग्रंथलेखनही बरेच केले. भारतातील जाती, त्यांची जडण घडण व विकास यावरील त्यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे Annihilation of Caste (जातीप्रथा निर्मूलन ) हा होय. जातीयतेच्या राक्षसाचा संहार केल्याशिवाय राजकीय किंवा सामाजिक परिवर्तन होऊ शकणार नाही, जात ही एक अत्यंत घातक संस्था आहे, शोषणाचे साधन म्हणून तिचा उपयोग केला जातो, चातुर्वण्यामुळे सामान्य जनतेचा ज्ञानार्जनाचा अधिकार नाकारला जातो, शस्त्रधारणेचा अधिकार नाकारल्याने समाजाचे अन्य घटक पौरुषहीन बनतात; समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या पायांवरच हिंदू समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे, पण त्याकरिता प्रथम जातिभेद व चातुर्वर्ण यांच्या पाठीशी असलेले धर्माचे अधिष्ठान नाहीसे झाले पाहिजे असे मौलिक विचार त्यांनी मांडले. आपल्या ग्रंथांतून त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या आपल्या लढयाची तात्त्विक

भूमिका स्पष्ट केली. अनेक सभांतून, परिषदांतून, मेळाव्यांतून वृत्त परिषदेतून जनजागरणाला गती देऊन त्यांनी राजकीय, आर्थिक व सामाजिक विषमता दूर करण्याच्या हेतूने दलित समाजाच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक हक्कांची मागणी केली. अस्पृश्यांची दुःखे व समस्या यांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी अखंड परिश्रम केले. अस्पृश्यांतर्गत जातिभेदावरही त्यांनी हल्ला चढविला. आपल्या समाजाचे ऐक्य ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे; त्यापुढे सगळे गौण आहे, वादळी वातावरणाला तोंड देण्यासाठी व आपली शक्ती कार्यान्वित करण्यासाठी आपण एकसंघ असले पाहिजे असे ते दलितांना सतत बजावीत होते.

१९४२ मध्ये कामगार खात्याचे प्रमुख म्हणून गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळावर आंबेडकरांची नियुक्ती झाली. १९४६ मध्ये घटनासमितीच्या निवडणुका झाल्या तेव्हा बंगालच्या विधिमंडळातून ते निवडून आले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची राज्यघटना तयार करण्याच्या कामाला सुरुवात झाली तेव्हा मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. ती जबाबदारी स्वीकारताना अनुसूचित जाती जमातींकरिता घटनेत संरक्षणात्मक तरतुदी करणे, त्यांच्यावरील अन्यायांचे परिमार्जन करून त्यांचे हक्क कायद्याद्वारे त्यांना मिळवून देणे हा त्यांचा एक प्रमुख हेतू होता. घटना तयार करताना केलेल्या भाषणात सामाजिक व आर्थिक समतेची आवश्यकता त्यांनी आग्रहाने प्रतिपादित केली व त्या दृष्टीने अस्पृश्यांच्या आर्थिक विकासासाठी घटनेद्वारा राखीव जागांची तरतूद केली. 'तिरस्करणीय गुलामगिरी व अमानुष अन्याय यांच्या गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात मी जन्माला आलो आहे त्या

समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यात मी अपयशी ठरलो तर मी स्वतःला गोळी घालून घेईन' असे उद्गार त्यांनी काढले होते. अस्पृश्यांवरील अन्याय दूर व्हावा व समाजातील विषमता नाहीशी होऊन अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने सर्व हक्क मिळावेत, एवढेच नव्हे तर त्यांच्या उत्थानाकरिता त्यांना खास सवलती दिल्या जाव्या याला काँग्रेसमधील प्रागतिक गटाचा पाठिंबा होताच. आंबेडकरांचे तर ते एक प्रमुख उद्दिष्ट होते. त्या दृष्टीने, अस्पृश्यतेचे निर्मूलन होऊन त्यांच्या विकासासाठी शिक्षणाची द्वारे खुली असावीत, समाजातील दुर्बल घटकांचे कोणत्याही प्रकारे शोषण होऊ नये; त्यांना सामाजिक न्याय मिळावा, केंद्रीय व राज्यीय शासकीय सेवात

काही पटे, तसेच, इंजिनिअरिंग, तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयांत व अन्य उच्च शिक्षण देणाऱ्या विद्यालयांत प्रवेश देताना काही जागा त्यांच्याकरिता राखीव असाव्यात, जमिनीचे वाटप करताना व घरबांधणी योजनात, तसेच शिष्यवृत्या, अनुदाने, कर्जे याबाबत त्यांना अग्रक्रम देण्यात यावा अशा तरतुदी घटनेत करण्यात आल्या आहेत.

**संदर्भ सुची**

1. डॉ.बी.आर. आंबेडकर, वसंत मून,
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, धनंजय किर
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डी.सी. अहिर
4. अनहिलेशन ऑफ कास्ट, डॉ.बी.आर. आंबेडकर
5. मेरी आत्मकथा, डॉ.बी.आर. आंबेडकर
6. रिडर्ल्स इन हिंदूनिझम, डॉ.बी.आर. आंबेडकर
7. द प्रॉब्लेम ऑफ रूपी, डॉ.बी.आर. आंबेडकर
8. द अनटचेबल, डॉ.बी.आर. आंबेडकर
9. पुना पॅक्ट, डॉ.बी.आर. आंबेडकर